मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# महापालिकेच्या स्थायी समिती सभापतींची निवड 28 फेब्रुवारीला होणार

## स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी विशेष सभा शनिवार, दि.28 फेब्रुवारी रोजी सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी विशेष सभा शनिवार, दि.२८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. ही सभा महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात होणार आहे.




या सभेत स्थायी समितीच्यासभापतीपदासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २१(१) नुसार निवड करण्यात येणार आहे. संबंधित नियमांनुसार ही निवड प्रक्रिया पार पडणार आहे. यावेळी पीठासीन अधिकारी श्रीमती पवनीत कौर अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका या असणार आहेत.

स्थायी समितीत भाजपचे वर्चस्व आहे. अभिषेक बारणे, शालिनी गुजर, मनिषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारिका गायकवाड, योगिता नागरगोजे, शीतल वर्णीकर, कृष्णा सुरकुले, अर्चना कारंडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन हे भाजपाचे ११ सदस्य आहेत. सभापती पदाचे संदीप कस्पटे आणि अभिषेक बारणे, बाबासाहेब त्रिभुवन हे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. आता पक्षश्रेष्ठी या तीन जणांपैकी कोणाला संधी देणार की धक्कातंत्र देत आणखी कोणाच्या गळ्यात सभापती पदाची माळ टाकणार हे पाहणं उत्सुकतेचे ठरणार आहे.

---

# रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद करण्याचे महापौर रवि लांडगे यांचे निर्देश

## शहरात सुरु असलेल्या रात्रीच्या स्वच्छता उपक्रमासह आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा महापौर रवि लांडगे यांनी घेतला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात सुरू असलेल्या रात्रीच्या स्वच्छता उपक्रमासह आरोग्य विभागाच्या कामकाजाचा आढावा महापौर रवि लांडगे यांनी आज घेतला. यावेळी रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. संबंधित अधिकाऱ्यांकडून उपक्रमाचे फायदे जाणून घेतल्यानंतर रात्रीची स्वच्छता मोहीम सुरू ठेवावी; मात्र त्यामध्ये केवळ पुरुष कर्मचाऱ्यांचा सहभाग ठेवावा, असेही ते म्हणाले. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.



### ‘माझी वसुंधरा’ पुरस्कार मिळाल्याबद्दल केले अभिनंदन..

**» पिंपरी चिंचवड महापालिकेला ‘माझी वसुंधरा’ हा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल आरोग्य विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे महापौरांनी अभिनंदन केले. हा पुरस्कार केवळ सन्मान नसून मोठी जबाबदारी असल्याचे सांगत पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि शाश्वत विकासाच्या दिशेने सातत्याने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.**

### महिलांची रात्रीची स्वच्छता शिफ्ट बंद

**» पिंपरी चिंचवड येथे रात्रीच्या स्वच्छता मोहिमेत महिलांची शिफ्ट बंद करून केवळ पुरुष कर्मचाऱ्यांचा सहभाग ठेवण्याचे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असून, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्याच्याही सूचना देण्यात आल्या.**

शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, असेही निर्देश त्यांनी दिले. शहर स्वच्छ ठेवणे ही प्रशासनासोबत नागरिकांचीही जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी. त्याचबरोबर शहरातील स्वच्छतेचा रोडमॅप तयार करण्यात यावा, असेही त्यांनी सांगितले. महापालिकेच्या दिवंगत मधुकर पवळे सभागृहात आरोग्य विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने शहरातील कचरा संकलन, कचऱ्याचे विलगीकरण, त्याची वाहतूक, सार्वजनिक स्वच्छतागृहे, रस्ते साफसफाई, पाणी स्वच्छता यासह विविध आरोग्यविषयक योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहायक आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे, अजिंक्य येळे, राजाराम सरगर, निवेदिता घार्गे, अश्विनी गायकवाड, पूजा दूधनाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह आरोग्य निरीक्षक व आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनीही आरोग्य विभागाच्या संबंधित विविध विषयांचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देत येणाऱ्या अडचणी मांडल्या. मनुष्यबळ, वाढती लोकसंख्या आणि काही भागांतील अंमलबजावणीतील अडथळे यावर त्यांनी प्रकाश टाकला. या सर्व बाबींवर प्रभावी उपाययोजना करून शहरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

# पिंपरी-भोसरीत AQI 421 ते 427; घातक हवेचा इशारा

## PM10 व PM2.5 वाढले; वाहतूक कोंडी व बांधकाम धुळीमुळे प्रदूषण तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी भागातील हवा गत 24 ते 48 तासांपासून घातक या गटांत गेली आहे. इतकी खराब हवा दिल्ली येथे गणली जात आहे. शनिवारी आणि रविवारी भोसरी भागातील हवेचा निर्देशांक तब्बल 421 ते 427 इतका गणला गेला. तसेच, शहरातील बहुतांश भाग हे गंभीर ते खराब गटांत वारंवार जात आहेत.

शहरातील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खराब ते अतिखराब गटात जात आहे. गत चोवीस तासांत भोसरी येथील हवेची गुणवत्ता 421 ते 427 मायक्रो ग्रॅम प्रति. चौ.मी.इतकी गणली गेली. जागतिक आरोग्य संघटनेच्या मानांकनाप्रमाणे ही गुणवत्ता घातक गटात आहे. तसेच, शहरातील शिवाजीनगर, निगडी, मुंढवा ,केशवनगर, पिंपरी-चिंचवडसह बहुतांश भागांतील भागांची हवा गंभीर गटांत गणली जात आहे.



### भोसरीत AQI ४२७; घातक पातळीची नोंद

» भोसरी भागात गेल्या २४-४८ तासांत हवेचा गुणवत्ता निर्देशांक ४२१ ते ४२७ इतका नोंदवला गेला. ही पातळी 'घातक' गटात येत असून राजधानी नवी दिल्ली मधील गंभीर प्रदूषणाशी तुलनात्मक मानली जात आहे. वाहनांचे वाढते प्रदूषण, बांधकामातील धूळ आणि हवामानातील बदल यामुळे हवेची गुणवत्ता सतत खालावत असल्याचे निरीक्षण आहे.

शहराचे क्षेत्रफळ मुंबईपेक्षा जास्त असून 500 चौ.मी पेक्षा जास्त विस्तार झाला आहे. लोकसंख्येत मोठी वाढ होत असताना दुप्पट ते तिप्पट संख्येने वाहने वाढत आहे. वाहन इंधनाच्या प्रदूषणासह शहरात धुळीचे कण मोठ्या प्रमाणावर हवेत उर्त्सजित होत आहेत. याला बांधकामाची धूळ देखील तेवढीच जबाबदार आहे. शहरातील हवेची गुणवत्ता दिवाळीनंतर पाऊस थांबताच खराब गटांत जाते. त्यानंतर डिसेंबरपासून अतिखराब गटांत गेली. जानेवारी ती गंभीर, तर फेब्रुवारीत घातक प्रकारांत जात आहे. यंदा प्रथमच भोसरी येथील हवेची गुणवत्ता गत चोवीस तासांत 400च्या वर गेली आहे.

हवेच्या गुणवत्तेत सूक्ष्म धूलिकण 10 पीएम. आणि अतिसूक्ष्म धूलिकण 2.5 यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसत आहे. वाहन इंधन ज्वलनातून हे कण बाहेर पडतात. शहरातील सततची वाहतूककोंडी हे मोठे कारण यामागे असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. यामुळे शहरात श्वसनाचे विकार वाढत आहेत.

भोसरी भागात गेल्या २४-४८ तासांत हवेचा गुणवत्ता निर्देशांक ४२१ ते ४२७ इतका नोंदवला गेला. ही पातळी 'घातक' गटात येत असून राजधानी नवी दिल्ली मधील गंभीर प्रदूषणाशी तुलनात्मक मानली जात आहे. वाहनांचे वाढते प्रदूषण, बांधकामातील धूळ आणि हवामानातील बदल यामुळे हवेची गुणवत्ता सतत खालावत असल्याचे निरीक्षण आहे.

### सूक्ष्म व अतिसूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढले

» हवेच्या गुणवत्तेत सूक्ष्म धूलिकण 10 पीएम. आणि अतिसूक्ष्म धूलिकण 2.5 यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसत आहे. वाहन इंधन ज्वलनातून हे कण बाहेर पडतात. शहरातील सततची वाहतूककोंडी हे मोठे कारण यामागे असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत. यामुळे शहरात श्वसनाचे विकार वाढत आहेत.

> शहरातील वाहतूक कोंडी हे प्रमुख कारण या मागे आहे. शहराच्या विविध भागांत बांधकामांची धूळदेखील वाढत आहे. औद्योगिक प्रदूषणाचा यात सहभाग तुलनेत कमी आहे. भोसरीबाबतची अशीच स्थिती आहे. तरी मी अधिकाऱ्यांना भोसरीबाबत विचारणा करतो. त्यावर काय उपाय योजना करता येईल, याकडे लक्ष देण्यात येईल.
>
> - बाबासाहेब कुकडे, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

# सुसंवाद हा 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वाचा मूलमंत्र : डॉ. संजय उपाध्ये

## अमृतमहोत्सवी 75 वे प्रवचनपुष्प गुंफताना 'विचार करूनच बोला!' या विषयावर डॉ. संजय उपाध्ये यांनी निरूपण केले.आहे.

**चिखली-| प्रतिनिधी**

सुसंवाद हा 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वाचा मूलमंत्र आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ निरूपणकार डॉ. संजय उपाध्ये यांनी काशीधाम मंगल कार्यालय, चिंचवडगाव येथे रविवार, दि.२२ रोजी केले. गांधी पेठ तालीम मित्रमंडळ आयोजित 'मन करा रे प्रसन्न!' या मासिक प्रवचनमालिकेतील अमृतमहोत्सवी ७५ वे प्रवचनपुष्प गुंफताना 'विचार करूनच बोला!' या विषयावर डॉ. संजय उपाध्ये यांनी निरूपण केले.



याप्रसंगी खासदार श्रीरंग बारणे, आमदार शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसेवक राहुल कलाटे, शेखर चिंचवडे, नगरसेविका मनीषा चिंचवडे आणि गांधी पेठ तालीम मित्रमंडळाचे अध्यक्ष राजाभाऊ गोलांडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती; तर विविध क्षेत्रांतील मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.

खासदार श्रीरंग बारणे यांनी 'विविध विषयांवर सलग पंचाहत्तर मासिक प्रवचनांतून डॉ. संजय उपाध्ये यांनी हिंदुत्वाची चळवळ सक्षम केली असून आता तरुणांनी या समाजप्रबोधनाच्या प्रवाहात सामील व्हावे!' असे आवाहन केले. आमदार शंकर जगताप यांनी, 'स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव काळात प्रवचनांचा अमृतमहोत्सव ही कौतुकास्पद बाब आहे!' असे गौरवोद्गार काढले. महापौर रवी लांडगे यांनी, 'कला, साहित्य, संस्कृती याविषयीचे ज्ञान प्रवचनातून प्राप्त होते!' असे विचार व्यक्त केले. राजाभाऊ गोलांडे यांनी प्रास्ताविकातून, 'डॉ. संजय उपाध्ये यांनी 'मन करा रे प्रसन्न!' प्रवचनमालिकेतून केलेले प्रबोधन पंतप्रधान यांच्या 'मन की बात'ची आठवण करून देणारे आहे!' असे मत व्यक्त केले.

डॉ. संजय उपाध्ये पुढे म्हणाले की, 'सद्गुणाचा अतिरेक ही देखील विकृती आहे. सर्वधर्मसमभाव किंवा धर्मनिरपेक्षता या गोष्टींच्या अतिरेकामुळे हिंदू समाज आपले अस्तित्व हरवत चालला आहे. त्यासाठी हिंदू समाजाला एकत्र येण्याची सवय लावली पाहिजे. त्यामुळे हिंदूंनी जातिभेदासह सर्व भेदाभेद दूर सारून आपापसात सुसंवाद साधला पाहिजे. अर्थातच व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्र या परिघात संवादाची व्याप्ती वाढली पाहिजे. त्यासाठी आधी स्वतःशी मग कुटुंब, समाज आणि राष्ट्राशी संवाद साधा. संवादात विचार करूनच बोलले पाहिजे; कारण एकदा तोंडातून बाहेर पडलेला शब्द परत घेता येत नाही. ज्ञानेश्वर माउलींनी 'बोल ते जे अर्णव पीयूषाचे...' असे वर्णन केल्याप्रमाणे आपले बोलणे हवे. अर्थातच ज्याला ज्या भाषेत कळते त्याच भाषेत बोलल्यावरच माउलींचे 'विश्व स्वधर्म सूर्ये पाहो!' हे हिंदुधर्माबाबतचे स्वप्न पूर्णत्वास जाईल!' आध्यात्मिक, पौराणिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजकीय संदर्भ उद्धृत करीत आपल्या नर्मविनोदी शैलीतून डॉ. संजय उपाध्ये यांनी श्रोत्यांशी सुसंवाद साधला. यावेळी चंद्रशेखर निलाखे यांनी श्रोत्यांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली.

ॲड. विपुल नेवाळे, ॲड. मोरेश्वर शेडगे, अवधूत कुलकर्णी, महेश गावडे, अनिरुद्ध येवले, बापू मिरजकर, सिद्धी नेवाळे, सुजाता पोफळे, बंडू भोकरे, प्रदीप गांधलीकर यांनी संयोजनात सहकार्य केले. सुहास पोफळे यांनी सूत्रसंचालन केले.

# महापालिकेची तिजोरी श्रीनाथ भिमालेंच्या हाती !

## स्थायी समितीच्या अध्यक्षपदी भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांची निवड झाली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या कोणाच्या ताब्यात जाणार, याचा फैसला सोमवारी झाला. स्थायी समितीच्या अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांची निवड झाली. महापालिकेच्या सभागृहात अध्यक्षपदाची निवडणूक झाली. त्यामध्ये भिमाले यांची बिनविरोध निवड झाली.

पुणे महापालिकेत सर्वाधिक जागा मिळवित दुसऱ्यांदा सत्ताधारी झालेल्या भारतीय जनता पक्षाकडून (भाजप) पाहिल्या वर्षी अध्यक्षपदासाठी कोणाला संधी मिळणार याबाबत निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून मोठी उत्सुकता होती. सुरुवातीपासूनच श्रीनाथ भिमाले यांच्यासह अन्य काही ज्येष्ठ नगरसेवकांच्या नावाची चर्चा होती. भाजपने महापौर पद सिंहगड रस्त्याला दिले. उपमहापौर पद बोपोडी भागात दिले. तर सभागृह नेते म्हणून गणेश बीडकर यांच्याकडे जबाबदारी देत कसबा विधानसभा मतदारसंघात संधी दिली. त्यामुळे स्थायी समितीच्या अध्यक्षपदाची संधी कोणत्या विधानसभा मतदारसंघाला मिळणार याबाबत तर्क वितर्क लावले जात होते.

गेल्या आठवड्यात झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये स्थायी समितीच्या सदस्यपदी भाजपने १२ सभासदांची निवड केली. यामध्ये आठ महिला सभासदांना तर चार नगरसेवकांना संधी दिली. स्थायी समितीमध्ये १६ पैकी १२ सभासद हे भाजपचे, तीन सभासद राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे तर एक सदस्य काँग्रेसचा आहे. त्यामुळे भाजपचा अध्यक्ष होणार हे निश्चित होते. भाजपने भिमाले यांना सदस्यपदी संधी दिल्याने तेच अध्यक्ष होणार हे स्पष्ट होते. त्याची औपचारिकता सोमवारी पार पडली.

भाजपकडून भिमाले यांनी अर्ज भरला होता. तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून सुहास टिंगरे यांनी अर्ज भरला होता. मात्र हा अर्ज भरताना एक मिनिट उशीर झाला होता. विभागीय आयुक्तांनी या निवडणुकीसाठी पिठासीन अधिकारी म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे (एसआरए) मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके यांची नियुक्ती केली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही निवडणूक झाली. निवडणुकीला सुरुवात झाल्यानंतर अर्जाची छाननी झाली. त्यामुळे टिंगरे यांचा अर्ज बाद करण्यात आल्याने भिमाले यांची निवड बिनविरोध झाली. भिमाले यांनी चार अर्ज भरले होते. तर टिंगरे यांनी एक अर्ज भरला होता.



### विषय समित्यांची अध्यक्षपदाची निवडणूक २७ फेब्रुवारी ला होणार

**» महापालिकेचा डोलारा संभाळण्याची जबाबदारी स्थायी समितीवर असते. त्यामुळे सुरुवातीला स्थायी समितीच्या अध्यक्षाची निवड केली जाणार आहे. त्यानंतर इतर विषय समित्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडीची प्रक्रिया होणार आहे.**

### श्रीनाथ भिमाले बिनविरोध अध्यक्ष

**» पुणे महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षपदीश्रीनाथ भिमाले यांची बिनविरोध निवड झाली. १६ पैकी १२ सदस्य भाजपचे असल्याने अध्यक्षपद भाजपकडे जाणे निश्चित होते. सभागृहात झालेल्या निवडणुकीत त्यांची औपचारिक घोषणा करण्यात आली.**

### सुहास टिंगरे यांचा अर्ज बाद

**» राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून सुहास टिंगरे यांनी अर्ज भरला होता; मात्र सादरीकरणास एक मिनिट उशीर झाल्याने तो बाद करण्यात आला. निवडणुकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून सतीशकुमार खडके यांची नियुक्ती करण्यात आली होती. अर्ज छाननीनंतर भिमाले यांची बिनविरोध निवड जाहीर झाली.**

# शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोबाबत मुरलीधर मोहोळ यांनी दिली गुड न्यूज

## शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रोची चाचणी यशस्वी, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांची 'जनता दरबारात' मोठी घोषणा.

**पुणे | प्रतिनिधी**

शिवाजीनगर-हिंजवडी ही पीपीपी मॉडेलवरील देशातील पहिली मेट्रो लवकरच पुणेकरांच्या सेवेत येईल. या २३ किलोमीटरच्या मेट्रो मार्गिकेची चाचणी यशस्वी झाली असल्याचे केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री खासदार मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. गोखलेनगर येथील शहीद तुकाराम ओंबाळे क्रीडांगणावर आयोजित १६ व्या 'जनता दरबारात' ते बोलत होते. मोहोळ यांनी नागरिकांचे प्रश्न ऐकून घेत त्यावर तातडीने तोडगा काढण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, उपमहापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेते गणेश बिडकर यांसह महापालिका, पोलिस तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शहराचा सर्वांगीण विकास करून त्याला देशातील सर्वोत्तम शहर बनवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे सांगत मुरलीधर मोहोळ म्हणाले, शहराचा खासदार या नात्याने मी आणि पालकमंत्री सुनेत्रा पवार पुणेकरांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

पुणेकरांनी दाखविलेला विश्वास महायुती सार्थ ठरवित आहे. नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण जनता दरबारच्या माध्यमातून केले जात असल्याचे मोहोळ यांनी सांगितले. पुण्यातील वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिकेचा वाघोलीपर्यंत आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट मेट्रो मार्गिकेचा कात्रजपर्यंत विस्तार होणार आहे. तर खडकवासला-खराडी आणि माणिकबाग ते नळस्टॉप या नवीन मार्गिकांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होऊन शहरातील वाहतूक कोंडी दूर होईल, अशी माहिती मुरलीधर मोहोळ यांनी दिली.




### मेट्रो विस्ताराला गती

**» वनाज–रामवाडी मार्गिकेचा वाघोलीपर्यंत आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट मार्गिकेचा कात्रजपर्यंत विस्तार प्रस्तावित आहे. तसेच खडकवासला–खराडी आणि माणिकबाग–नळस्टॉप या नव्या मार्गिकांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. या विस्तारामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होऊन वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.**

### २३ किमी मार्गिकेची यशस्वी चाचणी

**» वनाज–रामवाडी मार्गिकेचा वाघोलीपर्यंत आणि पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट मार्गिकेचा कात्रजपर्यंत विस्तार प्रस्तावित आहे. तसेच खडकवासला–खराडी आणि माणिकबाग–नळस्टॉप या नव्या मार्गिकांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. या विस्तारामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होऊन वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.**

# भोसरी उपकेंद्रातील रोहित्र बदलले; वीजपुरवठा सुरळीत

## भोसरीतील रोहित्र बदलण्याची प्रक्रिया पूर्ण केली असून या भागातील वीजपुरवठा पूर्ण क्षमतेने आणि सुरळीत सुरू झाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

महापारेषणच्या भोसरी उपकेंद्रात होणाऱ्या सततच्या बिघाडामुळे भोसरी-पिंपरी परिसरातील वीज ग्राहक विस्कळीत वीज पुरवठ्याच्या समस्येने त्रस्त होते.

फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्याच पंधरावड्यात भोसरी अतिउच्चदाब उपकेंद्रातील ८० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब रोहित्रामध्ये दोनदा बिघाड झाला. त्यातील रविवारी (१५ फेब्रुवारी) रात्री अकराच्या सुमारास झालेला बिघाड मोठ्या स्वरुपाचा असल्याने उपकेंद्रातील रोहित्र बदलण्याचा महापारेषण कंपनीने घेतला. सोमवारपासून सुरु असलेले रोहित्र बदलण्याचे काम अखेर रविवारी (२२ फेब्रुवारी) पूर्ण झाले.

महावितरणच्या भोसरी उपकेंद्रात मोठ्या प्रमाणात औद्योगिक ग्राहकांचा समावेश होते. पिंपरी-चिंचवड शहरातील भोसरी एमआयडीसी परिसरात पाच हजारांहून अधिक लहान-मोठे उद्योग आहेत. तसेच सुमारे ३५ हजार ग्राहक या परिसरात आहेत. गेल्या काही दिवसांपासून महापारेषण कंपनीच्या २२० के.व्ही. भोसरी अतिउच्चदाब उपकेंद्रातील ८० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब रोहित्रामध्ये वारंवार बिघाड होत होते.



### ८० एमव्हीए रोहित्रात वारंवार बिघाड

» महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) च्या २२० के.व्ही. भोसरी अतिउच्चदाब उपकेंद्रातील ८० एमव्हीए क्षमतेच्या रोहित्रात फेब्रुवारीत दोनदा बिघाड झाला. २ फेब्रुवारीला अंतर्गत दोष आढळल्यानंतर १५ फेब्रुवारीच्या रात्री पुन्हा मोठा बिघाड झाला. त्यामुळे रोहित्र बदलण्याचा निर्णय घेण्यात आला.

दोन फेब्रुवारीला भोसरीतील अतिउच्चदाब उपकेंद्रातील ८० एमव्हीए क्षमतेच्या अतिउच्चदाब रोहित्रात अंतर्गत बिघाड झाला होता. त्यानंतर १३ दिवसांनीच रविवारी रात्री ११ वाजता उपकेंद्रातील रोहित्रामध्ये पुन्हा बिघाड झाल्याने भोसरी व पिंपरी विभागातील एस ब्लॉक, जे ब्लॉक, डी दोन ब्लॉक, एफ दोन ब्लॉक, टी ब्लॉक, इंद्रायणीनगर, भोसरीगाव, जलवायू विहार, गंधर्व नगरी, सेक्टर चार, सहा, नेहरूनगर, संत तुकाराम नगर, दापोडी, कासारवाडी येथील वीज ग्राहकांवर त्याचा परिणाम झाला. त्यामुळे एमआयडीसी परिसरातील पाचशेहून अधिक कारखाने बंद ठेवण्याची वेळ उद्योजकांवर आली होती.

सातत्याने विस्कळीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे दैनंदिन कामे करणे अवघड झाल्याची प्रतिक्रिया ग्राहक व्यक्त करतात. तर, वीज पुरवठा खंडीत झाला की, उत्पादनावर त्याचा परिणाम होतो. बाजारपेठेतील स्पर्धेत उत्पादन मागे पडते. कामकाज ठप्प होत असल्याची भावना परिसरातील लघू उद्योजकांनी व्यक्त केली.

दरम्यान, महावितरणच्या भोसरी व पिंपरी विभागामार्फत पर्यायी व्यवस्थेच्या माध्यमातून वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला होता. दिवसभरात इतर वीजवाहिन्यांवर अतिरिक्त भार टाकून वीजपुरवठा सुरू करण्यात यश आले. परंतु, अतिरिक्त भारामुळे वीजपुरवठ्यात काही काळ व्यत्यय येत होता. या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले होते.

### उद्योगांवर मोठा परिणाम

» पिंपरी-चिंचवडमधील भोसरी एमआयडीसी परिसरात पाच हजारांहून अधिक उद्योग आणि सुमारे ३५ हजार ग्राहक आहेत. एस, जे, डी-२, एफ-२, टी ब्लॉक, इंद्रायणीनगर, संत तुकाराम नगर, दापोडी, कासारवाडी आदी भागांत वीजपुरवठा विस्कळीत झाला. ५०० हून अधिक कारखाने तात्पुरते बंद ठेवावे लागले.

### २२ फेब्रुवारीला काम पूर्ण

» महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) ने पर्यायी व्यवस्थेद्वारे वीजपुरवठा सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. १६ फेब्रुवारीपासून सुरू झालेले रोहित्र बदलण्याचे काम २२ फेब्रुवारीला पूर्ण झाले. नव्या रोहित्रामुळे वीजपुरवठा स्थिर झाल्याने ग्राहकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

# पुणे विमानतळाचा देशात डंका! 'या' श्रेणीत ठरलं सर्वोत्तम

## विमानतळ संचालक संतोष ढोके यांनी स्वीकारला पुरस्कार; मुरलीधर मोहोळ यांच्याकडून एएआय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक.

**पुणे | प्रतिनिधी**

विंग्स इंडिया २०२६ या नागरी विमान वाहतूक परिषदेत पुणे विमानतळ बेस्ट एअरपोर्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री यांच्या संयुक्त विद्यमाने हैदराबाद येथे आयोजित भारतातील प्रमुख नागरी विमान वाहतूक कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी हा पुरस्कार स्वीकारला.




वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर कार्यक्षम संचालन, मजबूत सुरक्षा मानके, प्रवासी सुविधा सुधारणा आणि उच्च दर्जाची सेवा प्रदान करण्यासाठी पुणे विमानतळाने सातत्याने केलेल्या प्रयत्नांची ही दखल आहे. संचालनातील विश्वासार्हता आणि प्रवासी सुलभता राखण्यात विमानतळाने उच्च मानके कायम ठेवली असून, १०-२५ एमपीपीए श्रेणीत देशातील आघाडीच्या विमानतळांपैकी एक म्हणून आपले स्थान बळकट केले आहे.

याबाबत अभिनंदन करताना मुरलीधर मोहोळ म्हणाले, पुणे विमानतळाचा गौरव अभिमानास्पद आहे. हा प्रतिष्ठेचा सन्मान एएआय अधिकारी, विमान कंपन्या, सुरक्षा यंत्रणा आणि ग्राउंड हँडलिंग कर्मचारी अशा संपूर्ण विमानतळ समुदायाच्या समर्पण, व्यावसायिकता आणि संघभावनेचे द्योतक आहे. पुणे हे उद्योग, शिक्षण आणि नवोपक्रमाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत असताना, विमानतळाची भूमिका कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यात आणि आर्थिक विकासाला चालना देण्यात अत्यंत महत्त्वाची आहे.

### 'विंग्स इंडिया २०२६'मध्ये गौरव

» पुणे विमानतळ ला 'बेस्ट एअरपोर्ट' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हैदराबाद येथे आयोजित नागरी विमान वाहतूक परिषदेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विमानतळाचे संचालक संतोष ढोके यांनी सन्मान स्वीकारला..

### १०-२५ एमपीपीए श्रेणीत आघाडी

» १०-२५ एमपीपीए प्रवासी क्षमतेच्या श्रेणीत पुणे विमानतळाने देशातील आघाडीच्या विमानतळांमध्ये स्थान मिळवले आहे. कार्यक्षम संचालन, मजबूत सुरक्षा मानके आणि प्रवासी सुविधांतील सुधारणा यामुळे हा सन्मान मिळाल्याचे स्पष्ट करण्यात आले.